# स. ब. खाडे कॉलेजमध्ये पदवीदान समारंभ

कुडित्रे : ‘ आजचे विद्यार्थी क्रांतिकारी जगात जन्माला आले हे त्यांचे भाग्य आहे. आज शिक्षणाच्या कक्षा प्रचंड विस्तारलेल्या आहेत. शिक्षण ही निरंतर प्रक्रिया आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनो, शिक्षणाच्या या प्रवाहात राहिलात तर डॉ. अब्दुल कलाम यांच्या भारताच्या महासत्तेचे स्वप्न साकार होईल,’ असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी केले.

कोपार्डे (ता. करवीर) येथील स. ब. खाडे महाविद्यालयाच्या पहिल्या पदवीदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य संजय जाधव तसेच अध्यक्षस्थानी सचिव प्रा. जयंत आसगावकर होते.



# पूनम कांबळे शिवाजी विद्यापीठात प्रथम

**सांगवडे / प्रतिनिधी :**

मार्च २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या बी.ए. भाग ३ च्या परीक्षेत हलसवडे (ता. करवीर) येथील पूनम मधुकर कांबळे हिने शिवाजी विद्यापीठात मराठी विषयात ५०० पैकी ४३० गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळविला. त्यांना शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारे शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे, गुरुवर्य वी. एस. उर्फ भाऊसाहेब खांडेकर, पूज्य स्वामी स्वरूपानंद व कै. लक्ष्मीबाई व्यंकटेश कुलकर्णी मेमोरियल इत्यादी पारितोषिकांनी सन्मानित करण्यात आले. तिला छत्रपती शाहाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण व मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. दीपककुमार वळवी यांचे मार्गदर्शन लाभले.